**नि.फौ.ख.क्र.११६/२०१४**
सरकार — वि.- शरद पवार
**निशाणी क्र. २१**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव — तन्वीर रशीद शेख (पंच)
वय — ३८ वर्षे, व्यवसाय — मजुरी
सध्या रा. - ताडीवाला रोड, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस.काशीद यांचे मार्फत सुरु-</u>**

दि. १९/०२/२०१४ रोजी मला यादवडे साहेबांनी पंचनाम्याकामी पोलीस स्टेशनला बोलवले होते. तेथे एक इसम नामे शरद मेहबा पवार हजर होता. माझे समक्ष यादवडे साहेबांनी त्याची अंगझडती घेतली. त्याच्या अंगझडतीमध्ये काही मिळुन आले नाही. तसेच त्याच्या शरीरावर मारहाणीबाबत निशाण नव्हते. माझे समक्ष पंचनामा करण्यात आला त्यावेळी दुसरा पंच महेश हजर होता. आता मला सदरचा पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरा पंच महेश, यादवडे साहेब यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २२** देण्यात येतो. मला गुन्हयाबाबत काही माहिती नाही. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.01.17 17:19:57 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. १७/०१/२०२६